# भारतातील घरगुती हिंसाचार कारणे व परिणामाचे समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. लीना गादेवार**

महीला महाविद्यालय, नंदनवन नागपुर

समाजशास्त्र विभाग

---

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५वर्षे पूर्ण झालेली आहे.स्त्रीने प्रत्येक क्षेत्रात झपाट्याने प्रगती केली आहे.पण भारतीय समाजात स्त्रीचे काय स्थान आहे यावर जर विचार केला तर अजून ही परिपूर्ण स्वातंत्र्य तिला मिळालेले दिसत नाही.आजही पितृसत्ताक संस्कृतीने स्त्रियांच्या प्रगतीमध्ये अनेक प्रकारच्या अडचणी व आव्हाने निर्माण करतांना दिसून येते. आज अनेक स्त्रिया नोकरी करतात नोकरी करताना अनेक अडचणी त्यांना येतात.या अडचणी सामाजिक कौटुंबिक दोन्ही प्रकारच्या पाहायला मिळतात.आज स्त्री नोकरी करीत असताना जरी स्वता भरगच्च पगार कमावत असेल तरी पण कुटुंबातील निर्णय स्वतः घेऊ शकत नाही. आजही भारतीय समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धती असल्यामुळे पुरुषांच्या निर्णयाला कुटुंबात जास्त महत्त्व दिले जाते.एखाद्या स्त्रीने स्वतः मत व्यक्त करण्याचा प्रयत्न केला तरी तिच्या मतांना विचारांना कानाडोळा केला जातो.एकीकडे आपल्या समाजात स्त्रीला देवीचे स्थान दिले जाते.तिला गृह लक्ष्मी समजल्या जाते पण आजही अनेक कुटुंबात श्रीमंत असो की गरीब ग्रामीण अथवा शहरी भागात घरगुती हिंसाचाराचे प्रमाण प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते याचे चित्रण वर्तमानपत्र यामध्ये पाहायला मिळते.थोडक्यात एकीकडे त्यांना देवी चे स्वरूप लक्ष्मी ,सरस्वती ,दुर्गा पूजन केले जाते.आणि दुसरीकडे पुरुषांपेक्षा त्यांना कनिष्ठ समजून सर्व अधिकारांपासून वंचित ठेवले जाते. बलात्कार, छेडछाड, मारणे ,जाळणे, टोचून बोलणे ,उपाशी ठेवणे.अशी अनेक अत्याचार स्त्रियांवर आजही होतांना दिसून .

**अध्यापनाची उद्दिष्टे :**

1. भारतातील घरगुती हिंसाचाराचे स्वरूप अभ्यासणे.
2. घरगुती हिंसाचार याचा अर्थ समजून घेणे.
3. घरगुती हिंसाचाराचा कारणांचा शोध घेणे.
4. घरगुती हिंसाचाराचे परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंध साठी तथ्य संकलन करीत असताना दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. याकरिता संदर्भ ग्रंथ, पुस्तके, इत्यादी उपलब्ध असलेला साधनांचा आधार घेऊन शोध निबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

**घरगुती हिंसाचाराचा अर्थ :**

इंग्रजी भाषेमध्ये डोमेस्टिक वायलेंस या शब्दां करिता मराठीत घरगुती हिंसाचार किंवा कौटुंबिक अत्याचार या संज्ञा चा उपयोग वापर केला जातो.प्रत्यक्षात घरगुती हिंसाचाराची व्याख्या करणे अवघड काम आहे.प्रत्येक अभ्यासकाने कौटुंबिक हिंसाचार यावर मंथन केले आहे. काही अभ्यासकांच्या मते शारीरिक मारहाणी मधून दुसऱ्या

व्यक्तीला त्याच्या शरीराला इजा होत असेल या कृत्याला हिंसक कृत्य असे म्हटले जाते.अभ्यासकांच्या मते कीवर्ड शारीरिक इजा म्हणजे कौटुंबिक हिंसाचार नसून ज्या कृत्यांमुळे दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बाधा निर्माण होत असेल किंवा आक्रमण होत असेल अशा कृत्यांना ही हिंसक कृत्य असे म्हटले जाते.घरगुती हिंसाचाराचे विभिन्न प्रकार होऊ शकतात.माहेरी आणि सासरी दोन्ही ठिकाणी स्त्रिया कौटुंबिक अत्याचाराला बळी पडतात.विवाह होईपर्यंत बऱ्याच कुटुंबात सावत्र आई मुलीवर शारीरिक किंवा भावनिक अत्याचार होताना दिसून येते.बऱ्याच मुली अशा वेळेला आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.अशा कुटुंबात  मुलींवर मानसिक आणि शारीरिक अत्याचार सतत होत असतात.

प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत स्त्रियांवर होत असलेले अत्याचार याचे स्वरूप जरी यामध्ये बदल होत असला तरी महिलांवर होणारे अत्याचार याचे प्रमाण वाढत आहे.याला प्रमुख कारण म्हणजे पितृसत्ताक संस्कृती होय.

**घरगुती हिंसाचार याची व्याख्या :**

**१) केम्पे यांच्या मतानुसार :**

"कौटुंबिक अत्याचार म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर शारीरिक हल्ला करून तिला जखमी करणे होय".

**२) गोलेस यांच्या मतानुसार :**

"अत्याचार म्हणजे पुरुष व्यक्तीची अशी कृती ही जो त्रास होईल ती जखमी होईल हा हेतू डोळ्यासमोर ठेवून कृती करणे म्हणजे कौटुंबिक छळ होय.

**घरगुती हिंसेचे स्वरूप :**

घरगुती हिंसाचाराची समस्या या जगात सर्वत्र पसरलेली आहे प्राचीन.काळापासून स्त्रियांवर होत असलेले अत्याचार त्याचे पुरावे आजही आपल्याला आढळतात.आधुनिक काळातही या समस्येचे स्वरूप स्त्रियांवर होणारे अत्याचार गंभीर स्वरूपात वाढत असल्याचे दिसून येते.त्यामुळे त्यांच्यावर होत असलेले अत्याचार,याचे चित्रण आपल्या वर्तमानपत्रात वाचायला मिळते. प्रत्येक कुटुंबामध्ये स्त्रियांवर कमी-अधिक प्रमाणात अन्याय अत्याचार सुरूच आहे.आजही.ग्रामीण भागात आजहीअनेक भागात लहानपणीच मुलीचा विवाह लावून दिला जातो.जर लग्नामध्ये हुंडा नसेल मिळाला तर सासरचे लोक तिचा अमानुषपणे छळ करतात. त्यामुळे काही स्त्रिया कंटाळून या छळाला आत्महत्या करतात. स्त्रियांची आजची स्थिती अत्यंत वाईट आहे संसारात प्रत्येक माणसाची समजूत आता करणे त्यांच्या मतानुसार जीवन जगणे ह्या गोष्टीला ती कंटाळते.स्त्रियांना गरीब आणि अडाणी ठरविले जाते.त्यामुळे ती आजही ही अनेक अन्याय अत्याचार सहन करून घरातच बसली आहे. या अत्याचाराविरूद्ध ती बोलत नाही. त्यामुळे अनेक कुटुंबात अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे.स्त्रियांच्या समस्या संबंधित त्यांच्या प्रश्नांवर अनेक समाजसुधारकांनी समाजात जाणीव निर्माण केली.कारण त्या काळात त्यांना स्वतःचे मत शिक्षण घेण्याचा अधिकार कुठलाच अधिकार त्यांना नव्हता. अशाप्रकारे आजही विनयभंग, बलात्कार , लैंगिक अत्याचार , स्त्री भ्रूण हत्या असे अनेक प्रश्न स्त्रियांच्या संदर्भात भारतीय समाजात आजही पाहायला मिळते.स्त्रियांच्या विरोधात अनेक कायदे निर्माण झालेली आहे पण या कायद्याचा विशिष्ट प्रभाव समाजावर झालेला दिसून येत नाही . आजही आपल्याला त्यांची छेद काढणे अपहरण  ,बलात्कार होऊन जिवंत जाळने अशा हिंसाचाराची उदाहरणे घडत असल्याचे आजही

आढळते इच्छा नसतानाही अनेकदा स्त्रीयांवर बळजबरी करून तिच्यावर शारीरिक मानसिक भावनिक प्रहार केला जातो. त्यालाच हिंसा असे म्हटले जाते.

**घरगुती हिंसाचाराची कारणे :**

घरगुती हिंसाचाराचे चे प्रमाण समाजामध्ये का वाढत आहे त्यांची उगम स्तोत्रे कोणती त्याची मूलभूत कारणे पुढील प्रमाणे.

**१) पितृसत्ताक कुटुंब पद्धती :**

प्राचीन काळापासून स्त्री स्त्रियांवर अनेक प्रकारचे आणि सामाजिक बंधने लादल्या गेली. त्यामुळे स्त्रिया या गुलामगिरीत जीवन जगत होत्या यामागे प्रमुख कारण धर्मशास्त्राचा आधार स्त्री ही पुरुषापेक्षा कनिष्ठ आहे.शिक्षणाचा अधिकार नाही तिला शिक्षण दिले तर ती आपल्या संसाराचा वाटोळा करेल स्त्रियां बाबतीत चुकीच्या गोष्टी त्याकाळी पसरल्या होत्या .याच्या परिणाम स्त्रियांवर होणारे अत्याचार वाढले.त्यामुळे तिला अनेक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले.

**२) अयोग्य समाजीकरण :**

कुटुंबामध्ये मुलामुलींमध्ये भेदभाव केला जातो . हे आपल्याला त्यांच्यावर होतं होत असलेल्या संस्कारातून दिसून येते. यांचा उगम सामाजिक करण्यातूनच होते संस्कार करताना दोघांमध्ये भेदभाव केला जातो.मुलींना आज्ञाधारक पणा शिस्त या बाबी लहानपणापासून शिकवले जाते आणि मुलांना कुठलेही काम न करण्याची सवय लावली जाते.त्यांचे सर्व काम आई करते.सामाजीकरण वेगवेगळ्या पद्धतीने केले जाते . मुलींना परक्याचे धन समजून तिच्या विकासाकडे दुर्लक्ष केले . त्याचबरोबर लहानपणापासूनच मुलींना आज्ञेचे पालन ,सर्व निमूटपणे सहन करणे ,लहानपणापासूनच पुरुषांची सेवा करणे,या सर्व बाबी लहानपणापासूनच संस्कारात द्वारे मुलींना दिले जाते . परिणाम कुटुंबातील सदस्यांना स्त्री ही दुर्बल . ती कमजोर आहे म्हणून तिच्यावर अत्याचार याचे प्रमाण वाढत आहे.

**३) स्त्रियांची आर्थिक बाजू कमजोर :**

भारतामध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण फार कमी आहे . त्यामुळे अशा अनेक स्त्रिया हे त्या स्वतः काहीच करत नाही घरगुती काम करून घरात लक्ष देतात आणि घरी दिवस-रात्र काम करतात. त्यामुळे त्यांना आपली आर्थिक गरज भागवण्यासाठी कुटुंबातील पुरुष वर्गांकडे हात पसरावे लागते. त्यामुळे कुटुंबातील अनेक स्त्रिया त्यांच्यावर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेला विरोध करीत नाही मुकाट्याने सहन करतात.आणि याचा फायदा त्यातील पुरुष वर्ग घेतात.

**४) वाईट व्यसन :**

अनेक कुटुंबात पुरुषांना वाईट व्यसन असते त्यामुळे असे पुरुष व्यसनाच्या आहारी जाऊन स्त्रियांवर अन्याय अत्याचार करतात. बहुतेक कुटुंबात मद्यपान करून पुरुष स्त्रियांवर मारहाण करतात. मद्यपानामुळे पुरुषांमध्ये स्त्रियांवर हिंसा करण्याची हिंमत वाढते. त्यामुळे ते छोट्या लहानशा गोष्टीवरून भांडण करतात. दारूचे प्रमाण इतके जास्त असते की त्यांना कोणत्या गोष्टीचे भान नसते. आणि अनेकदा स्त्रिया स्वतःच्या जीवालाही बळी पडतात.

**५) जाणून बुजून दुर्लक्ष :**

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण वाढत . त्यावर उपाय म्हणून विविध कायदे निर्माण झालेली आहे तरी पण त्या कायद्यांचा उल्लंघन होताना दिसून येतो. घरगुती हिंसेचे कारण वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे घरगुतीहिंसाचाराला होत असलेले दुर्लक्ष होय.आजही अनेक कुटुंबात पती-पत्नीचे भांडणे होतात.पण ही बाब सामान्य म्हणून घरातील लोक शेजारचे दुर्लक्ष करतात त्यामुळे तो पुरुष स्त्रियांवर सतत अन्याय अत्याचार करतो. आणि त्याची हिमंत वाढते.कधीकधी अशा स्त्रिया पोलीस स्टेशन मध्ये तक्रार करायला जातात तेव्हा त्यांना घरगुती भांडण आहे असे सांगून त्या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे स्त्रिया या अन्यायाविरुद्ध बोलत नाही.त्याचा परिणाम घरगुती हिंसाचाराचे वाढते प्रमाण.

६) **स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण कमी :**

प्राचीन काळापासून स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आले होते.त्यामुळे स्त्रियांचे अज्ञानाचे प्रमाण वाढत गेले अनेक शैक्षणिक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. शिकलेली स्त्री अनेक कठीण प्रसंगात आत्मविश्वासाने पुढे जाईल असा विश्वास आज जरी दिसत असला तरी आजही अनेक भागात स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे.त्यामुळे निरक्षरतेचे प्रमाणही जास्त आहे .त्यामुळे अनेक स्त्रिया स्वतःहून अन्याय अत्याचार सहन करीत असतात . घरातील बदनामी कशाला करायची हा महत्त्वाचा प्रश्न त्यांच्यापुढे असतो त्यामुळे पुरुष वर्गाची हिंसा करण्याची हिंमत वाढत आहे .

**घरगुती हिंसाचाराचे परिणाम :**

**१) स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम :**

घरगुती हिंसाचाराचा परिणाम सर्वात जास्त स्त्रीच्या आरोग्यावर होतो.सतत होणाऱ्या अत्याचारामुळे तिची नीट झोप होत नाही. त्याचा परिणाम तिच्या आरोग्यावर होतो. कित्येक वेळा तिला उपाशीपोटी राहावे लागते . अनेकदा शारीरिक मारपीट मधून शरीराच्या अनेक भागाला इजा होते अनेकदा कायमचे अपंगत्व बाळगत जीवन जगावे लागते .

**२) मानसिक तणाव :**

कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या प्रमाणामुळे स्त्री ही मनाने खचून जाते.त्यामुळे तिच्या जीवनात आनंद राहत नाही. सतत ती तणावाखाली असते . याचा परिणाम तिच्या मुलांवरील होतो.जीवन जगण्याची इच्छा संपून जाते.सतत त्या मानसिक बाबा तणावाखाली जीवन जगत असतात.रात्रंदिवस झोप न येणे ,सतत चिंता करणे आता आपला कसा होईल या विचाराने ती सतत अस्वस्थ होते.अशा प्रकारचा मानसिक परिणाम स्त्रियां वर होताना दिसून येते.

**३) वैवाहिक जीवनातील परिणाम :**

अनेक लहान मुलींच्या बालवयातच करण्यात आलेले लैंगिक शोषण त्यांच्या पुढच्या आयुष्यासाठी खूप मोठे आव्हान असते.कारण हे वाईट प्रसंग त्ती विसरू शकत नाही त्यामुळे त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झालेला असतो. मनात झालेल्या लैंगिक शोषणामुळे लैंगिक संबंधांबद्दल द्वेष निर्माण होते .आणि या भीतीमुळे त्यांच्या पुढच्या विवाहित जीवनात अनेक अडचणी निर्माण होतात.या मुलींचा विश्वास नातेवाईकां पूर्वीसारखा राहत नाही.

**४) विवाहित स्त्रिया लैंगिक अत्याचाराला बळी :**

अनेकदा स्त्रिया स्वतःच्या घरी सुरक्षित नसतात. आजही अनेक कुटुंबात पती म्हणून पत्नीची इच्छा नसताना देखील जबरदस्तीने लेंगिक समाधान प्राप्त केले जाते.अशावेळी पत्नीने प्रतिसाद दिला नाही तर तिच्यावर जबरदस्ती केली जाते. गर्भवती स्त्रियांवर देखील ही स्थिती निर्माण होते. तिच्या आरोग्याचाही विचार केला जात नाही.

**५) आत्महत्यांचे वाढते प्रमाण :**

सततच्या होणाऱ्या कौटूंबिक हिंसाचारामुळे त्यांची सहनशीलता संपून जाते. त्यामुळे अशा अनेक स्त्रिया घरगुती हिंसाचाराला कंटाळून आत्महत्या कडे वळतात.त्यांच्याकडे दुसरा पर्याय उरलेला नसतो.

**६) वधूला जाळणे :**

कायद्याने जरी बंदी असली तरी आजही अनेक कुटुंबात लग्नामध्ये हुंडा न मिळाल्यामुळे कुटुंबातील सदस्य विवाहित वधु वर तेल टाकून जाळण्याचे प्रमाण आज ही समाजात होत असल्याचे दिसून येते. ती स्वतःजळली असा कारण सांगितले जाते .आणि आरोप झाकले जातात दडपले जाते.त्यामुळे गुन्ह्याचे प्रमाण वाढत आहे.

**७) स्त्रियांच्या प्रमाणात घट :**

आजही भारतीय समाजामध्ये मुलगा हा वंशाचा दिवा आहे हे विधान अनेक ठिकाणी बोलले जाते.मुलाच्या हौसेपोटी स्त्रीलिंगी गर्भाची चाचणी करून स्त्रीलिंग गर्भाची हत्या केली जाते.म्हणजेच बाळ होण्याअगोदरच मुलगी आहे हे कळल्यानंतर मुलीची पोटातच हत्या केली जाते . त्यामुळे तर दर हजारी पुरुषामागे स्त्रियांच्या प्रमाणात घट होत असल्याचे आढळून येते.

**घरगुती हिंसा कमी करण्याचे उपाय :**

- स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे.
- स्त्रियांच्या साक्षरते मध्ये आणि शिक्षणामध्ये वाढ करणे.
- महिला संघटना निर्माण करणे.
- स्त्रियांच्या संतुलित व्यक्तिमत्वाचा विकास करणे.
- लोक जागृती आणि स्त्री मुक्ती लढा निर्माण करणे.

**सारांश :**

अशाप्रकारे भारतीय समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धती मुळे कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण वाढत आहे.घरगुती हिंसाचार ही समस्या जगात सर्वत्र पसरत आहे. शैक्षणिक क्षेत्रात स्त्रीने किती हि प्रगती केली तरीही आजही त्या घरगुती हिंसाचाराला बळी पडत आहे.स्त्रीही अज्ञानी असो की सुशिक्षित प्रत्येक स्त्रीला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडावे लागत आहे. स्त्री ही सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित नाही. नेहमी स्त्री अत्याचाराला बळी पडत आहे. त्यामुळे ही समस्या सर्वव्यापी दिसून येते प्रश्न केवळ सार्वजनिक ठिकाणी स्त्रीवर होत असलेल्या अत्याचाराचा नाही. तर ती आज स्वतःच्या घरीच देखील सुरक्षित नाही. आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराविरुद्ध बोलत नाही. त्यामुळे ही समस्या सतत समाजात वाढत आहे. घरगुती हिंसाचार हे फार मोठी

सामाजिक समस्या आहे. त्यामुळे जोपर्यंत त्यांच्याकरिता कठोर नियमावली आवश्यक आहे जोपर्यंत योग्य आणि नियोजित प्रयत्न करणार नाही तोपर्यंत घरगुती हिंसाचार यांची समस्या संपणार नाही स्त्रीने पुढे येऊन आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली पाहिजे. न घाबरता आपली आपली बाजू तिने मांडली पाहिजे तरच तिला योग्य न्याय मिळू शकेल आणि पुरुषांची हुकुमशाही कमी होईल.

**संदर्भसूची :**


- राम आहुजा, सामाजिक समस्याए , रावत पब्लिकेशन्स
- प्रा. मनोहर तोटरे, सेट/ नेट समाजशास्त्र विद्याभारती प्रकाशन लातूर.
- डॉ. आर.बी. मेक्षाम , आणि समस्या विद्या प्रकाशन नागपूर.
- प्रा. डॉ. प्रमोद पाटील ,भारतीय समाज प्रश्न आणि अंशुल पब्लिकेशन्स.
- रा. ज. लोटे , समाज आव्हाने आणि समस्या पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर.


.